# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३२५ - २३** **दिनांक : - २०/०९/२०२३**

**"अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडून काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत 'कोडेन फॉस्फेट' हा अंमली पदार्थ मिश्रीत कफ सिरप बाटल्या व** Alprazolam Tablets I.P. 1.0 mg **नावाच्या टॅबलेट व्यावसायीक प्रमाणात जवळ बाळगणाऱ्या ईसमावर कारवाई.**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत आगामी गणेशोत्सव सणाच्या पार्श्वभुमीवर मिरारोड, काशिमिरा, भाईंदर, नयानगर, नवघर परिसरात अंमली पदार्थ खरेदी विक्री होत असल्याने वरिष्ठांनी सदर ठिकाणी जाउन गस्त करुन गस्ती दरम्यान अंमली पदार्थ खरेदी व विक्री करणारे इसमांवर कायदेशीर कारवाई करणेबाबत तोंडी आदेश दिलेले होते त्या अनुषंगाने दि.१८.०९.२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक.अमर मराठे, सपोनि.अमोल आंबवणे, पोलीस अंमलदार पो.हवा.९२००६/इंगळे, पोहवा. ०५०१०/टक्के, पोहवा.०२०१७/पाटील, पोहवा.०३०७५/कुडवे, पोहवा.०६०४४/सपकाळ असे पोलीस पथक मिरारोड, भाईंदर, नयानगर, नवघर, काशिमिरा, हाटकेश, घोडबंदर, चेना, काजुपाडा परिसरात रवाना झाले होते.

गस्ती दरम्यान घोडबंदर, काजुपाडा, चेना भागात गस्त करुन काशिमीरा बाजुकडे परत येत असताना साई व्दारकेश काठीयावाडी ढाबा, दहिसर(मुंबई)वाहिनी समोरील रोडवर दोन ईसम आपआपसात हातवारे करुन एकमेकांशी बोलत असल्याचे व कोणाची तरी वाट पाहत असल्याचे आमचे निर्दशनास आले. तसेच त्यांचे जवळील सफेद रंगाची नायलॉनच्या गोणीमध्ये कोणतातरी अंमली पदार्थ असल्याची शक्यता निर्माण झाल्याने त्यास ताब्यात घेण्यात आलेले आहे.

नमुद दोन्ही इसमांची पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याचे कब्ज्यात 'कोडेन फॉस्फेट' हा अंमली पदार्थ मिश्रीत कफ सिरपच्या १,५०,०००/-रु.किंमतीच्या ३०० बाटल्या व Alprazolam Tablets I.P. 1.0 mg नावाच्या २,१६,०००/-रु.किंमतीच्या १०,८०० टॅबलेटस् असा एकुण ३,६६,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्या असुन तो पंचनाम्याव्दारे जप्त करण्यात आला आहे. नमुद ईसमाविरुध्द एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८(क), २२, २२(क), २९ प्रमाणे काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ाा ६५७/२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी पथकामार्फत चालु आहे.

सदरची कारवाई मा.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पो.नि.अमर मराठे, स.पो.नि.अमोल आंबवणे, पोउपनि. संतोष घाडगे, पो.हवा.इंगळे, टक्के, पाटील, कुडवे, सपकाळ, आव्हाड, पो.अं. यादव यांनी केली आहे.




**----0000----**